# बातमीपत्र
# पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर
## माहिती कक्ष, दि. २८ एप्रिल २०२३

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | २६१/२०२३ भादंविसक ३७९ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २७/०४/२०२३ रोजी ११.०० व ते ११.३० वा चे दरम्यान, लोटस एम आर आय स्कॅन क्लिनिक, मुरारजी पेठ, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २७/४/२०२३ रोजी २२.४७ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | स्वप्निल बाबूराव होसुर, वय- ३० वर्षे, रा. ए विंग, प्लॉट नं. ३२ उत्सव चौका जवळ, सेक्टर ०५, खार जि. रायगड, सध्या - ए विंग, दर्बी कलेक्शनच्या पाठीमागे, रेल्वे लाईन सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | | ५०,०००/- रु ची २० ग्रॅम वजनाची एक सोन्याची चैन |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे वरील ठिकाणी पाठीचा एम आर आय करण्याकरीता गेले असता, उघडया चेंजिंग रुममध्ये पॅन्टच्या मागील खिशात ठेवलेली फिर्यादीची वरील वर्णनाची चैन कोणीतरी अज्ञात चोरटयाने हॉस्पीटलच्या चेंजिंग रुम मध्ये प्रवेश करुन, फिर्यादीचे संमतीशिवाय, मुद्दाम लबाडीने चोरुन नेली आहे म्हणून. तपास:- पोहेकॉ/ ७४५ डोके- ९८२३८१३०३१ |

## सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | २८६/२०२३ भादंविसक ३२३,३२४,५०४,५०६,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २४/०४/२०२३ रोजी ००.१५ वा चे सुमारास, फिर्यादीचे राहते घरी, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २७/४/२०२३ रोजी ०७.०८ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | मोनेश शंका घंटे, वय- २९ वर्षे, रा. घर नं. ५४५, कोनापूरे चाळ, रेल्वे लाईन, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) योगेश नागेश आनंद, २) व्यंकटेश नागेश आनंद, ३) चंद्रकांत ऊर्फ सोनू व्यंकटेश, ४) लक्ष्मी नागेश आनंद, सर्व रा. कोनापुरे चाळ, रेल्वे लाईन, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीचे राहते घरी, मागील भांडणाचा राग मनात धरुन, यातील वरील आरोपीतांनी तुम्हाला लय माज चढलाय, तु व तुझा भाऊ अमर तुम्ही आम्हास घरी येवून मारहाण करता, तुला व तुझ्या भावास जिवंत सोडत नाही असे म्हणून. शिवीगाळी करुन वरील आरोपीतांनी त्यांचे हातातील लोखंडी पाईप व लाथाबुक्याने मारहाण केली. त्यावेळी फिर्यादीचा भाऊ अमर व फिर्यादीची पत्नी हे भांडण सोडविण्याकरीता आले असता त्यांना देखील लोखंडी पाईप व लाथाबुक्याने मारहाण केली आहे. त्यावेळी यातील आरोपीत क्रं. १ यांनी लोखंडी पाईप फिर्यादीचे डोक्यात मारुन दुखापत केली आहे म्हणून. तपास:- पोहेकॉ/ ११६ माडे - ९५१८७३४११६ |

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | २३२/२०२३ भादंविसक ३७९ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २२/०४/२०२३ रोजी ०८.०० वा ते १६.०० वा चे सुमारास, फिर्यादीचे राहते घरासमोर, सोलापूर |

| | | |
|---|---|---|
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २७/४/२०२३ रोजी ००.४१ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | युनुस ईलाही मुलाणी, वय- ४९ वर्षे, रा. प्लॉट नं. ११०/ए, सहारा नगर, होटगी रोड, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | | १०,०००/- रु एक होंडा कंपनीची काळया रंगाची सी बी शाईन मोटार सायकल |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील वरील वर्णनाची मोटार सायकल क्रं. एम एच १३ सी एल ८१०२ ही वरील ठिकाणी लावली असता, कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे संमतीवाचून, मुद्दाम लबाडीने चोरुन नेला आहे म्हणून. तपासः- पोहेकॉ/ ११९५ बहिर्जे - ९९२३२०३४३० |

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | २३३/२०२३ भादंविसक २७९,३३७,१३४ ब,४२७, मोवाकाक १८४/१७७ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २३/०४/२०२३ रोजी २०.३० वा चे सुमारास, नवीन विजापूर नाका, जकात नाक्या समोर, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २७/४/२०२३ रोजी १९.५७ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सर्फराज शहनवाज पठाण, वय- २६ वर्षे, रा. ११२८, शास्त्री नगर, शानदार चौक, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | एम एच ०१ बी बी ९८९७ महिंद्रा एक्सयुव्ही ५०० या कारचा चालक नाव पत्ता माहित नाही |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील वरील आरोपीत वाहन चालकाने त्याचे ताब्यातील कार ही अविचाराने, हयगयीने, भरधाव वेगाने चालवून विजापूरहुन सोलापूरच्या दिशेने येवून रोडवरील बॅरीकेटला धडकुन फिर्यादी चालवित असलेल्या हिरो कंपनीची एच एफ डिलक्स मोटार सायकल क्रं. एम एच १३ डी यु ००८० हिस समोरुन जोराची धडक देवून फिर्यादीला तसेच फिर्यादीचा मित्र सोहेल रफी शेख असे दोघांच्या दुखापतीस कारणीभुत झाला आहे. सदरचा कारचालक हा अपघाताची खबर न देता तसाच निघुन गेला आहे म्हणून. तपासः- पोहेकॉ/ ४२३ म्हेत्रे - ७०२०४९१४८९ |